## -:: प्रकरण - १ ले ::-

### ऊसतोडणी कामगार - सर्वसाधारण माहिती

# प्रकरण १ ले

## उसतोडणी कामगार - सर्वसाधारण माहिती

१·१ प्रास्ताविक

१·२ भटके लोक व उसतोडणी कामगार

१·३ उसतोडणी कामगारांना उसतोडणीस भाग पाडणारे घटक

१·४ निवडीची पध्दती·

१·५ कामाच्या ठिकाणची सर्वसाधारण परिस्थिती

१·६ उसतोडणी कामगारांचे प्रकार

१·७ उसतोडणी कामगारांचा राहण्याचा परिसर

१·८ मुकादम - एक शोषक घटक

१·९ निवास व्यवस्था

१·१० उसतोडणी कामगार व स्थानिक समाज - संबंध

१·११ उसतोडणी कामगारांचे दैनंदिन जीवन

१·१२ उसतोडणी कामगार व त्यांचे वेतन

१·१३ कामाच्या ठिकाणचे कौटुंबिक जीवन

१·१४ उसतोडणी कामगारांचे सामाजिक जीवन

१·१५ उसतोडणी कामगार व राजकीय स्थिती

१·१६ गळीत हंगामानंतरची स्थिती

## प्रकरण - १ ले

## ऊसतोडणी कामगार - सर्वसाधारण माहिती

### १.१ प्रास्ताविक :

उसाच्या गळीत हंगामामध्ये महाराष्ट्रातील प्रत्येक कारखाना परिसरात तसेच गु-हाळघरांच्या परिसरामध्ये मोठया प्रमाणावर छोटया छोटया झोपडयांचे समुह आढळून येतात. या झोपडयात उसाच्या गळीत हंगामामध्ये महत्वपूर्ण कार्य करणारा श्रमिक म्हणजेच ऊसतोड कामगार रहात असतो. हे ऊसतोड कामगार आपले दैनंदिन जीवन कसे जगत असतील १ त्यांची सामाजिक परिस्थिती कशी असेल १ त्यांच्यापुढे कोणत्या समस्या प्रामुख्याने असतील १ या उत्कंठतेतून ऊसतोड कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन करता आले. शेतकरी उत्पादन करीत असलेल्या विविध पिकांमध्ये ऊस हे एक नगदी अथवा पैशाचे पीक समजले जाते. परंतु ऊसतोड कामगारांना मात्र या पैशाच्या पिकाचा फक्त जगण्यासाठी उपयोग होतो. असेच म्हणावे लागेल.

साखर उद्योग हा एकमेव असा उद्योग आहे की, जो ग्रामीण भागामध्ये उभारला जातो व ज्यामध्ये अकुशल श्रमाला फार मोठया प्रमाणावर मागणी असते. अकुशल श्रमाचा पुरवठा ऊसतोड कामगारांच्याकडूनच मोठया प्रमाणावर होत असतो. ऊसतोड कामगाराकडून पुरविले जाणारे श्रम हे जरी अकुशल स्वरुपातील असले तरी देखील या उद्योगात ते अत्यंत महत्वाचे आहेत. साखर उद्योगाचे दृष्टीने जरी ऊसतोड कामगारांचे श्रम महत्वाचे असले तरी

देखील या घटकाकडे साखर कारखान्यांनी अथवा शासनाने विशेष लक्ष पुरविल्याचे दिसून येत नाही. कोल्हापूर जिल्हा वगळता इतरत्र(सातारा, सांगली इ.) ऊसतोडीचे काम करणा-यामध्ये स्थानिक लोकांचे प्रमाण फारच कमी आढळते. बाहेरुन विशेषत: दुष्काळी भागातून या लोकांचे येथे आगमन होते. प्रामुख्याने बीड, उस्मानाबाद, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली इत्यादी जिल्हयांच्या दुष्काळी भागातील हे कामगार असतात.

कराड तालुक्यात कृष्णा सहकारी साखर कारखाना रेठरे बु।। तसेच सहयाद्री साखर कारखाना, यशवंतनगर हे दोन कारखाने आहेत. या कारखान्यात ऊसपुरवठा होण्यासाठी काम करणारे ऊसतोडणी मजूर उपरोक्त भागातीलच जास्त प्रमाणात आढळतात. स्थानिक ऊसतोडणी कामगारांचे प्रमाण कराड तालुक्यात अत्यंत अल्प प्रमाणात आहे.

## १.२ भटके लोक व ऊसतोडणी कामगार :

ज्याप्रमाणे भटक्या जमातीतील लोकांच्या टोळया विविध भागामध्ये अनुकूल अशा विशिष्ट कालावधीसाठी वास्तव्य करतात आणि हा विशिष्ट कालावधी संपल्यानंतर दुसरीकडे रहावयास जातात त्याप्रमाणेच हे लोकदेखील कारखाना परिसरामध्ये आपले वास्तव्य सतत बदलताना आढळतात. एका ठिकाणावरील ऊस संपताच दुस-या ठिकाणी आणि शेवटी सर्व कारखाना परिसरातील ऊस संपताच आपल्या मूळ गावाकडे परत जाणे असे त्यांचे फिरते जीवन आपणाला आढळून येते. त्यांच्या या फिरत्या जीवनाचा त्यांच्या एकूण सामाजिक जीवनावर खूप परिणाम घडवून आणतो. त्यातील बरेचसे परिणाम त्यांना आणखी दु:स्थितीकडे नेणारे असतात. मार्क्सने आपल्या "कॅपिटल" या ग्रंथात वर्णन केलेल्या भांडवली संचयाच्या सामान्य नियमातील " भटके लोक " या संकल्पनेप्रमाणे

ऊसतोड कामगार म्हणजे साखर उद्योगाचे एकप्रकारचे पायदळ सैन्यच असते. मार्क्सने या संकल्पनेत ज्यांचा जन्म शेतक-यात होतो परंतु ते काम मात्र औद्योगिक क्षेत्रात करतात आणि जरुरीप्रमाणे त्यांना इकडे-तिकडे धाडण्यात येते अशा लोकांचा विचार केलेला आहे. तसाच काहीसा प्रकार या ऊसतोडणी कामगारांबाबत आढळतो.[१]

## १.३ ऊसतोडणी कामगारांना ऊसतोडणीस भागपाडणारे घटक :

साधारणत: असे दिसते की, ऊसतोडणी कामगार हे काम स्वखुशीने करावयास आलेले नसतात. त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याने नाईलाजास्तव हे काम ते लोक स्विकारतात. त्यांच्या मूळ गावाकडे असणारी नैसर्गिक परिस्थिती, परंपरागत असणारे दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, अशिक्षितता, शिक्षणाच्या सोयीचा अभाव इ. अनेक घटक त्यांना या कामाकडे ओढून नेतात.

### अ) दुष्काळी स्थिती :

कृष्णा सहकारी साखर कारखाना आणि सहयाद्री सहकारी साखर कारखाना यांच्या परिसरात काम करणारे कामगार हे ज्या अहमदनगर, बीड, सोलापूर, उस्मानाबाद, सातारा व सांगलीच्या कांही भागातून येतात हा सर्व भाग शुष्क पठारी प्रदेशात आणि शुष्क पठारी प्रदेशाच्या पूर्व भागात येतो. हा प्रदेश ७५० मि.मी. सम पर्जन्य रेषेत येतो. पावसाच्या बेभरवशामुळे या भागाच्या प्रादेशिक अर्थकारणावर नेहमी धोक्याची टांगती तलवार असते;[२] त्यामुळे लहान शेतक-यांवर तसेच ज्या कुटुंबात कोणीही व्यक्ती नोकरीस नाही अशा कुटुंबावर उपासमारीची पाळी येते.

त्यामुळे हे लोक काम शोधण्यासाठी बाहेर पडतात. ऊसतोडणी कामामध्ये किंवा त्यासारख्या इतर कामामध्ये सहभागी होण्याशिवाय त्यांच्यापुढे पर्याय रहात नाही. उपरोक्त जिल्हयातील कांही भाग जलसिंचन सोयीमुळे समृध्द आहेच. परंतु ज्या भागात अशा सुविधांचा आभाव आहे तेच लोक या दुष्काळाला तोंड देण्यासाठी व पोट भरण्यासाठी या व्यवसायात शिरतात असे वाटते. या जिल्हयातील दुष्काळी तालुक्यातील शेतीची सुधारणा न झाल्यामुळे साखर कारखान्यांना अकुशल श्रमाचा पुरवठा चांगला होत आहे.

दुष्काळग्रस्त कोरडवाहू शेतकरी ऊसकापणीसाठी येतो. सहा महिने खोपटात राहतो. गावी पोट भरत नाही म्हणून दरवर्षी हंगामी स्थलांतर करतो. पाथर्डी, आष्टी, पाटोदा येथे शेती सुधारली नाही म्हणून हुकमी ऊसतोडणी कामगार आज साखर कारखान्यांना मिळत आहे. दरवर्षी स्थलांतर केल्यामुळे मुलांचे शिक्षण होत नाही त्यांना जीवनमान सुधारण्यास कोणताच मार्ग नाही;[३] दुष्काळामुळे निर्माण झालेल्या दुष्काळ चक्रातून ऊसतोडणी कामगाराला बाहेर पडणे अवघड होवून बसले आहे.

ब) दारिद्रय :

घरातील कोणतीही व्यक्ती नोकरीस नाही, जमीन नाही आणि असली तरी दुष्काळी स्थितीमुळे या कोरडवाहू जमीनीतून मिळणारे अल्पप्रमाणातील उत्पादन, यामुळे बरेचसे ऊसतोडणी कामगार दारिद्रयरेषेच्या खालचे राहणीमान जगत आहेत. तसे पाहीले तर आपल्या संपूर्ण देशातच द्रारिद्रय रेषेखाली जगणा-या लोकांचे प्रमाण खूप आहे. दारिद्रयरेषेच्या खालच्या पातळीवर असणा-या लोकसंख्येचे प्रमाण किती याबाबत तज्ञात मतभेद असले तरीपण कोणत्याही योग्य निकषानुसार ग्रामीण भागात दारिद्रय

प्रचंड प्रमाणावर पसरले आहे. सन १९६७-६८ मध्ये भारतातील ५०.६% लोक (म्हणजेच २१० द.ल.लोक) दारिद्र्यरेषेच्याही खालच्या पातळीवरील जीवन जगत होते.[४] या विधानाप्रमाणे भारताच्या सर्वसाधारण ग्रामीण भागातील लोकांची अशी स्थिती आहे परंतु पुर्णत: दुष्काळी स्थिती असणा--या ग्रामीण भागातील या ऊसतोडणी कामगारांची अवस्था यापेक्षाही दयनिय अशी आहे.

शासनाने अब्जावधी रुपये खर्च करुन आखलेल्या सिंचन योजनेतून-देखील ऊसतोडणी कामगारांना त्यांच्या जमिनीसाठी पाण्याचा उपयोग करुन घेता येत नाही. हे तर निर्विवाद सत्य आहे. या सिंचनक्षमतेचा वापर उपरोक्त दुष्काळी भागात केला जात नसल्याने त्या पाण्याचे अत्यंत विषम वाटप होऊन श्रीमंती आणि गरीबीचे ध्रुवीकरण वाढत आहे.[५] सतत वाढणारे दारिद्र्य ऊसतोडणी कामातून विकासाला उपलब्ध होऊ न शकणारा कसल्याही प्रकारचा उपाय यामुळे ऊसतोडणी कामगार आहे त्याच स्थितीत किंवा त्यापेक्षा खालच्या पातळीच्या दर्जाकडे घसरत चालला आहे.

क) <u>अशिक्षितपणा</u> :

ऊसतोडणी कामगारांच्यामध्ये बरेचसे लोक अशिक्षित आहेत. त्यामुळे त्यांच्या अशिक्षिततेचा फायदा त्यांच्याशी संबंधीत असणारे बरेच लोक घेतात. हा कामगार ऊसतोडणीच्या कामासाठी जेंव्हा बाहेर पडतो त्यावेळेस त्याच्याबरोबर त्याची पत्नी, लहान मुले असे मिळून ते बाहेर पडतात. मुळातच त्याचे व त्याच्या पत्नीचे शिक्षण झालेले नसते. त्यातच मुलांनाही त्याला बरोबर कामाच्या ठिकाणी न्यावे लागत असल्यामुळे त्यांचे शिक्षण पूर्ण होऊ शकत नाही. ऊसतोड कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित अशीच राहून जातात. शिक्षणाच्या आभावामुळे ही मुले पुढे याच

व्यवसायात राहणार असे दिसते. मुळातच अशिक्षितपणामुळे आजचा ऊसतोडणी कामगार लुबाडला जात आहे. त्याच्या पुढील पिढीदेखील अशिक्षितपणामुळे आणखी लुबाडली जाणार आहे.

ऊसतोडणी कामगारांच्यामध्ये बरेचसे लोक अशिक्षित आहेत. त्यांच्यात कारागिरी अथवा तंत्रज्ञानाचा आभाव दिसतो. त्यामुळे त्यांच्यापुढे ऊसतोडणीसारख्या कामाशिवाय पर्यायच उरत नाही.

ड) चा-याचा प्रश्न :

दुष्काळी भागातील हे कोरडवाहू शेतकरी आणि शेतमजूर हे या ऊसतोडणीच्या कामावर जास्त प्रमाणात येतात. रोजगार हमी योजनेपेक्षा या कामावर ते जास्त प्रमाणात येतात. त्यांच्याजवळ असणा-या बैल,गायी यांच्या चा-याचा प्रश्न या कामावर आल्यानंतर सुटू शकतो, तसेच ऊस-वाहतुकीसाठी बैलांचा वापर त्यांना करून घेता येणे शक्य असते. ऊसतोडणीचा हंगाम संपल्यानंतर जेंव्हा हा ऊसतोडणी कामगार आपल्या मूळ गांवाकडे परततो तेंव्हा चा-याचा प्रश्न बिकट होऊन चारा टंचाईला त्याला तोंड द्यावे लागते. ऊस वाहतुकीसाठी वापरात असणा-या बैलांची तो व्यवस्थितरित्या निगा ठेऊ शकत नाही. सतत पडणा-या दुष्काळामुळे आणि चा-याच्या टंचाईमुळे त्याला आपली जनावरे खाटीक खान्याकडे देखील नाईलाजाने पाठवावी लागतात. जोपर्यंत ते ऊसतोडीचे काम करत आहेत तोपर्यंत चा-याचा प्रश्न एवढया जास्त प्रमाणात उद्भवत नाही.

इ) कर्जबाजारीपणा :

सतत पडणा-या दुष्काळामुळे आणि ऊसतोडीच्या कामाच्या हंगामी

स्वरुपामुळे ऊसतोडणी कामगार सतत कर्जातच आढळतात. महाराष्ट्रातील सर्वच ग्रामीण, भागामध्ये कर्जबाजारीपणाचे प्रमाण आपणास जास्त आढळते. " रिझर्व बँन्केने केलेल्या पाहणीवरुन महाराष्ट्रातील निरनिराळ्या जिल्हयात शेकडा पंचवीस ते तीस पासून पन्नास ते साठ टक्क्यापर्यंत कुटुंबे कर्जात असावीत असे दिसते. यामध्ये जसे लहान शेतकरी आहेत त्याचप्रमाणे मोठे शेतकरी देखील आढळतात. यातील कांही कर्ज सरकारी किंवा सहकारी सोसायट्यांचे असले तरी अधिकांश कर्ज सावकार, व्यापारी किंवा नातेवाईकाकडून घेतले जाते." [६]

जर उपरोक्त स्थिती सर्वसाधारणत: संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण भागाची असेल तर ऊसतोडणी करणा-या दुर्बल घटकांची स्थिती कशी असेल ? याची कल्पनाच केलेली बरी. गावातील उत्पन्नाच्या बाबतीत वर्षभर मेहनत करावयाची आणि वर्षातून एकदातरी उत्पन्न हाती मिळेल याचीही शाश्वती नसायची अशा अनिश्चिततेमुळे ऊसतोडणीच्या कामाकडे वळावयाचे व तेथेही हालाखीत दिवस काढावयाचे आणि लग्न, मयतीसारख्या प्रसंगांना तोंड देण्यासाठी कर्जात पुन:पुन्हा खेचले जावयाचे अशाप्रकारच्या दुष्ट चक्रामधून त्यांना कधीच बाहेर पडता येत नाही. मुकादमासारख्या घटकाकडून या ऊसतोडणी कामगारांना सतत उचल यास्वरुपात बिनव्याजी असे एकप्रकारे कर्जच दिले जाऊन कर्जबाजारीपणात त्यांना गुरफटुन ठेवले जाते.

ई) श्रमाची अनुपलब्धता :

मूळ गावाकडे पडणा-या सततच्या दुष्काळामुळे तेथील परिसरात काम उपलब्ध नसते. महाराष्ट्रात चालू असलेल्या रोजगार हमी योजनेमुळे थोडयाफार प्रमाणात काम उपलब्ध होऊ शकते. " राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम " यासारख्या योजनामधुनही काम उपलब्ध होते. परंतु

या कामामध्ये मिळणारी मजूरी त्यांना फक्त जगवू शकते. या योजना राबविणा-या यंत्रणामधील दोषामुळे अनेकवेळा काम उपलब्ध होउ शकत नाही. त्यामुळे दुष्काळी भागातील हे लोक उसतोडणीकडे आकर्षिले जातात. उसतोडणी कामगारामध्ये जास्त भरणा हा दुष्काळी भागातील ग्रामीण विभागातील भूमीहीन शेतमजूर आणि अनिर्वाहक्षम शेतक-यांचाच जास्त असतो.

" पॉवर्टी इन इंडीया " या आपल्या ग्रंथात वि.म.दांडेकर यांनी जे सर्वसाधारण ग्रामीण भागातील रोजगारीचे वर्णन केले आहे ते तेथे लागू होते. त्यांनी जे शेतमजूरांचे वर्णन केले आहे, त्यांच्या रोजगारीचे स्वरुप स्पष्ट केले आहे. त्यांच्यात आणि उसतोडणी कामगारांच्या रोजगारीच्या स्वरुपात फारसा फरक आढळणार नाही त्यांच्या मते, " हे लोक कांही अंशी घरच्या शेतीत काम करतात, कांही अंशी दुस-याच्या शेतावर मजूरीने जातात, आणि कांही अंशी बिगर शेतीत व धंद्यात अथवा सार्वजनिक कामावर मजूरी करतात. असलीच तर थोडयाशा जमिनीखेरीज त्यांच्यापाशी निर्वाहाचे अन्य साधन नसते. त्यामुळे जमीन नसली किंवा घरच्या शेतीत काम नसले म्हणजे जेथे कोठे काम असेल ते मिळविण्याचा ते प्रयत्न करतात.

माणसे फार व एकूण काम कमी त्यामुळे कांहींना फार काम मिळते कांहींना मिळत नाही. एक दिवस मिळते दुस-या दिवशी मिळत नाही. शेतीत, हंगामात आणि वर्षभर अधुन-मधुन काम मिळते. त्यावरच ते प्रामुख्याने उदरनिर्वाह करतात. शेतीत काम नसले म्हणजे इतरत्र रस्त्यावर, धरणावर, बाजारात नाहीतर बस स्टॅन्डवर ते काम शोधतात. कोठेच काम मिळाले नाही म्हणजे ते बेकार बसून असतात. तात्पर्य शेतीच्या मंदीच्या काळातील बेकारी व अर्धबेकारी हे त्यांच्या रोजगारीचे वैशिष्टय

नसून त्यांना वर्षभर मिळणारा रोजगार "अनियमीत व अपुरा " असतो आणि ते वर्षभर अधून मधून बेकार वा अर्धबेकार असतात. हे त्यांच्या रोजगारीचे वैशिष्टय आहे. शेतीतील कामाचे "हंगामी स्वरुप" हे त्यांच्या बेकारीचे कारण नसून त्यांना उपजिविकेचे निर्वाहक्षण साधन नसते आणि हमखास रोजगार नसतो हे त्यांच्या बेकारीचे वा अर्धबेकारीचे कारण आहे. निर्वाहक्षम शेती नाही. गावच्या शेतीत पुरेसे काम नाही. परंतु शेतीतून गावातून बाहेर पडावे असा हमखास धंदा व रोजगार नाही म्हणून ते तेथेच चिकटून राहतात. तेथे असेल ते काम त्या सर्वात विभागले जाते आणि सारेच कमीअधिक प्रमाणात बेकार वा अर्धबेकार राहतात. या विवेचनात सर्वसाधारण ग्रामीण भागातील शेतमजुरांची स्थिती वर्णन केलेली आढळते.[७] ऊसतोडणी कामगारांच्या बाबतीत यात अधिक भर म्हणून गावाकडे असणा-या दुष्काळामुळे तेथे कामच नाही आणि म्हणून ते साखर कारखान्याच्या परिसरात ओढले जातात. शेतीतील अशा प्रकारच्या कामाशिवाय त्यांच्याजवळ दुस-या प्रकारचे काम करण्याचे कौशल्य असत नाही.

उ) पाण्याखालील जमीनीचा आभाव :

ऊसतोडणी कामगार ज्या दुष्काळी भागातून येतात त्या भागाला शासनाने तयार केलेल्या जलसिंचन योजनांच्या पाण्याचा लाभ मिळत नाही. महाराष्ट्रामध्ये आज आपणास असेही कांही दुष्काळ असणारे भाग सापडतील की जेथे जलसिंचन सुविधांचा लाभ घेता युऊन त्यांनी समृध्दी साध्य केली आहे. शेती पाणीपुरवठयाच्या अभावामुळेच या लोकांच्यावर ही पाळी आली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी आपले शासननिर्णय जाहीर करताना असे म्हटले आहे की, "महाराष्ट्रातील शेती व्यवसाय निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असतो. निसर्गाची साथ नसलेल्या वर्षी

ग्रामीण महाराष्ट्रात राहणा-या लक्षावधी कुटुंबाचा संसार उध्वस्त होतो. राज्यात पाण्याच्या उपलब्धतेची मर्यादा आहे. त्या संदर्भात राज्यशासन निश्चितच प्रयत्नशील आहे. एकूण जमिनीपैकी सर्व प्रयत्नांनंतर पाण्याखाली येणारे जमिनीचे क्षेत्र फक्त १४% एवढे आहे. म्हणून शेती नेहमी परावलंबी राहते. शेतकरी अडचणीत येतो. घेतलेली कर्जे तो वेळेवर परत करु शकत नाही."[८] ही अवस्था सर्वच शेतक-यांची असेल तर ऊसतोडणीचे काम करणा-या मजुरांची स्थिती याहून बिकट आहे. कारण जरी त्याच्याकडे शेती असली तरी जलसिंचन सुविधांचा लाभ नसल्यामुळे उत्पन्नाचे नगण्य आहे. जमिनी असुनही ब-याच जणांची स्थिती भुमिहीन शेतमजूरासारखी आहे.

ऊ) विशिष्ट प्रादेशिक स्थिती :

ऊसतोडणी कामगार ज्या भागातून येतात त्या वेगवेगळ्या भागांचा अभ्यास केला असता साम्य आढळते. प्रादेशिक भिन्नता निर्माण करणा-या घटकांचा विचार केला असता, समाजशास्त्रज्ञांच्या मतानुसार अशी भिन्नता निर्माण करणारे घटक पुढील प्रमाणे सांगता येतील.[९]

(१) नैसर्गिक परिस्थिती : निसर्गाची सुरक्षिततेच्या दृष्टीने उपलब्धता, माती, जलसंपत्ती व इतर.

(२) कृषी अर्थव्यवस्थेची स्थिती : भटक्या स्वरुपाची स्थिती, कायम स्वरुपी स्थिती, व्यापारी स्वरुपाची स्थिती.

(३) सामाजिक स्थितीचे स्वरुप : संरक्षणाची गरज, मालमत्तेचे प्रकार व इतर.

या बाबींचा विचार करता या ऊसतोडणी कामगारांची गावे

वेगवेगळ्या विभागात येत असली तरी वरील बाबतीत त्यांच्या स्थितीत विशिष्ट प्रकारे साम्य आढळते. त्या त्या वेगवेगळ्या विभागातून

१. निसर्गाची असुरक्षितता - दुष्काळासारख्या आपत्ती.
२. शेतीच्या बाबतीत व्यापारी स्वरूपाच्या शेतीचा पाणी पुरवठयाच्या अभावी आढळून येणारा अभाव.
३. दारिद्र्य हेच वैशिष्टय आढळून येते.

ओ) राजकीय परिस्थिती :

ऊसतोडणी कामगार ज्या विभागातून येतात त्या विभागात नियोजनाच्या मार्गाने प्रगती साधणा-या योजनांचा पुरेसा विकास झालेला नाही असे दिसते. त्यामुळे कृषीक्षेत्रामध्ये त्या त्या भागामध्ये विकास आढळून येत नाही. नियोजनविषयक आखल्या गेलेल्या अनेक योजनापैकी बहुतांशी उत्पादक योजना, रोजगारप्राप्ती आणि वाढ घडवून आणणा-या योजना या भागामध्ये आढळत नाहीत. नव्याने अशा पाणी पुरवठा सुविधा किंवा इतर विकासविषयक सुविधा होतील. याचीही अजुनतरी चिन्हे दिसत नाहीत. या विवेचनातून या भागांच्या विकासाकडे दुर्लक्ष होत आहे.

सध्याची सहकारी साखर कारखानदारी आणि राजकारण यांच्या विषयी चिंतन केले तर या भागांचा म्हणजेच आटपाडी, जत, कवठे महांकाळ, माण, पाथर्डी, आष्टी, पाटोदा, सांगोला इ. तालुक्यात त्याचप्रमाणे बीड, उस्मानाबाद, नगर जिल्हयातील इतर आणखी कांही तालुक्यामध्ये जाणीवपूर्वक विकास योजना रोखून त्यांच्या विकासात अडथळे आणले जातात काय अशी शंका वाटते.

जर या ऊसतोड कामगारांच्या मूळ गावाकडे अशा विकास योजना राबवल्या तर सहकारी अथवा खाजगी साखर कारखान्यांना हा हुकुमी मजूर उपलब्ध होऊ शकणार नाही राजकारण आणि साखर उद्योग यांचे आजच्याकाळात असणारे नाते लक्षात घेतले तर अशी शंका घेण्यास खूप वाव निर्माण होतो. डॉ.सुलभा ब्रम्हेंच्या मते " ऊस शेतीत जी काम संपन्नता वाढली आहे ती दोन टक्के जमिनीवर दुर्मिळ पाण्याचा बेहिशेबी वापर करुन, म्हणजेच बहुसंख्य कृष्टकर्त्यांना विकासाचा फायदा नाकारुन।"[१०]

आतापर्यंतच्या विवेचनावरुन ऊसतोड कामगारांना अशा प्रकारचे कष्टाचे काम स्विकारण्यास भाग पाडणा-या घटकांचा विचार केला. वरील घटकांच्या प्रमाणेच इतरही कांही वैयक्तिक घटक असू शकतात. ऊस तोडीचे काम करणारे अगदी अल्प प्रमाणात स्थानिक मजूर देखील आढळतात. ते बहुतांशी भुमिहीन असतात.किंवा जमीन असलीच तर ती अत्यंत अल्प व कोरडवाहु असते.की जिच्यातून ते वर्षभरात पुरेल इतके उत्पन्न घेऊ शकत नाहीत.

ऊसतोडणीचे काम करावयास भाग पाडणा-या घटकांचा विचार मांडताना हे मजूर बहुतांशी ज्या भागातून रेठरे बु।। आणि यशवंतनगर या कराड तालुक्यातील साखर कारखाना परिसरामध्ये काम करावयासाठी येतात त्या भागाच्या परिस्थितीचा विचार केलेला आहे.

## १.४ निवडीची पध्दती :

सांगली, सातारा, अमरावती, सोलापूर, भंडारा, अकोला, परभणी वगैरे जिल्हयातील सगळे साखर कारखाने दुष्काळी भागातून येणा-या मजूरावर अवलंबून आहेत. सातारा जिल्हयातील आटपाडी, जत, तासगांव,

कवठेमहांकाळ, सोलापूर जिल्हयातील सांगोला, बीड जिल्हयातील प्रामुख्याने आष्टी, केज, जामखेड, बीड, माजलगांव, पाथर्डे या तालुक्यातील तसेच नगर व उस्मानाबाद जिल्हयातूनही मजूर येत असतात. या कामगारांना कामावर घेताना करावयाच्या निवडीच्या विश्लेषणाबाबत सहयाद्री सहकारी साखर कारखाना, यशवंतनगर येथील एक शेती अधिकारी श्री.मोरे यांच्याशी चर्चा केली व त्यातून कामासाठी मजूर जमा करताना येणारे अडथळे व मजूर जमा करण्याची पध्दती याविषयी माहिती उपलब्ध झाली.

(१) जून व जुलै महिन्यामध्ये कारखान्याचे अधिकारी दुष्काळी भागामध्ये जाऊन आपली कार्यालये उभी करतात. ही कार्यालये तात्पुरत्या स्वरुपाची असतात. कार्यालय उभारल्या नंतर ठेकेदाराशी किंवा उपठेकेदाराशी संपर्क साधला जातो.


(२) कारखाना, ठेकेदार व मजूर यांच्यामध्ये वाटाघाटी होऊन उचलीचा दर ठरतो. ही उचल तीन हप्त्यामध्ये परंतु कारखान्याच्या गळीत हंगाम सुरु होण्यापूर्वी द्यावयाची असते. उचलीचा तिसरा हप्ता मजूरांना प्रत्यक्ष कामावर बाहेर नेण्यापूर्वी द्यावयाचा असतो.

(३) उचलीचा दर दोनप्रकारे ठरतो कोयता व बैलगाडी असे ते दोन प्रकार. कोयता याचा अर्थ नवराबायकोची जोडी तर ज्यांच्याजवळ बैलगाडी आहे त्यांची बैलगाडी ठरवली जाते.

(४) उचलीचा दर कोयत्याला १००० ते १५०० रुपये तर बैलगाडीला रु.२५०० ते ३५०० रुपये ठरविला जातो.

(५) उचलीचे हप्ते देताना कारखान्याचे अधिकारी खूप सावधपणे वागतात, कारण या मजूरांचे प्रमाण कमी व सर्व साखर कारखान्यांची मागणी यामुळे

* "कोयता" (ऊसतोडणीचे हत्यार) *



* "कोयता" (ऊसतोडणी कामगारांच्या पती-पत्नी किंवा अन्य जोडीसाठीचे सांकेतिक नाव) *



कारखान्यांच्यामध्येही आपसात स्पर्धा असते ते एकमेकात स्पर्धा करतात. मजूरांचे गट (टोळ्या) ते आपसात पळवतात. त्यामुळे हप्ते देताना दुसरा एखादा साखर कारखाना त्यांना मिळला आहे का याचा शोध ते घेतात. वरील सर्व बाबी पूर्ण झाल्यानंतर आक्टोंबर मध्ये गळीत हंगाम सुरु होण्यापूर्वी या सर्व कामगारांना कारखान्यांच्या ट्रकमधून आणले जाते.

कारखाना अधिकारी व ठेकेदार (मुकादम) हे या कामगारांना इकडे आणतात. हे मुकादम कांही वेळा वेगळ्या सामाजिक आर्थिक गटातून आलेले असतात. पण ब-याच वेळा ते त्यांच्यातीलच असतात व त्यांच्या -बरोबरच काम करतात.[११]

ब-याचदा या कामगारांना इकडे आणताना अपघात झाल्याचीही उदाहरणे आहेत. अशाप्रसंगी कारखान्याकडून मदतीची अपेक्षा ठेवता येत नाही. उदा. ५ नोव्हेंबर,८८ रोजी असुर्ले ता.पन्हाळा येथील सहकारी साखर कारखान्यासाठी केज जि.बीड येथील ३७ लोकांना घेऊन येताना या कारखान्याचा एक ट्रक कळंबी गावापासून एक कि.मी व मिरजेपासून ८ कि. मी अंतरावर एका खड्डयात आदळून झालेल्या अपघातात १ महीला आणि तीन लहान मुले (४ वर्षाखालील) ठार झाली होती. एकूण २२ लोक जखमी झाले असे वृत्त होते.[१२] परंतु या प्रसंगी कारखान्याने कांही मदत दिल्याचे वृत्त नव्हते. स्वत:च्या जीवनाबद्दल सतत अनिश्चिततेची भावना आणि प्रत्यक्ष तशा स्थितीत या लोकांना आपले जीवन जगावे लागते.

## १.५ कामाच्या ठिकाणची सर्वसाधारण परिस्थिती :

कामाच्या ठिकाणी असणा-या परिस्थितीचा प्रथम औद्योगिक क्षेत्राच्या दृष्टीकोणातूनच विचार केला पाहिजे. साखर उद्योग हा ग्रामीण

* ऊसतोडणी कामगार (प्रत्यक्ष काम करताना) *



* कामाचे ठिकाणी बालकांना निवारा *



भागात चालणारा आणि इतर औद्योगिक क्षेत्राप्रमाणेच विकसित झालेला आणि फार मोठी आर्थिक उलाढाल करणारा उद्योग आहे. या उद्योगातील हे ऊसतोड कामगार प्रवासी अथवा हंगामी स्वरुपाचे असले तरी औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्याप्रमाणे त्यांना कामाच्या स्थितीबाबत कोणत्याही प्रकारची चांगली व्यवस्था आढळत नाही. इतर औद्योगिक क्षेत्रात त्याप्रमाणे कामाच्या स्थितीबाबत कांही निश्चित अशा स्वरुपाच्या अटी आढळतात. तशा येथे आढळत नाहीत. दिवसभर कष्ट करुन, उन्हातून दिवसभर काम करावे लागल्यामुळे चेहरे अगदी रापल्यासारखे दिसतात.

कामाच्या वेळेबाबत कसल्याच प्रकारचे नियोजन नसते. समाजा, दिवसभर ऊस तोडून मोळ्या बांधून तयार केल्या आणि वेळेवर ट्रक आला नाही व संध्याकाळी अगदी झोपी गेल्यानंतर ट्रक आला तर उठून ट्रक भरुन देण्यासाठी स्त्री-पुरुषांना पुन्हा शेतावर जावे लागते. अशा वेळी ऊस भरताना उजेडाची व्यवस्था असेलच असे सांगता येत नाही. कारण ऊस रात्रीच्या वेळी गाडीत भरताना ऊसाच्या शेताच्या मालकाने उजेडाची व्यवस्था करावयाची असते. हे मालक उजेडाची व्यवस्था करतीलच असे सांगता येत नाही. उजेडाची व्यवस्था झाली नाही तरी देखील ट्रक भरावयाचे काम करावेच लागते. उजेडाची व्यवस्था म्हणजे विशेष असे कांही नसून एकदोन ब गॅस बत्यांची सुविधा उपलब्ध व्हावी लागते. आणि ती देखील होईल की नाही हे सांगता येत नाही. गॅसबत्ती उपलब्ध झाली तरी तो उजेड पुरेसा नसतो. कारण ऊस वाहून नेणारा ट्रक शेताच्या बाहेर उभा असतो. ऊसाच्या मोळ्या उचलून नेण्याचे ठिकाण आणि ट्रक यामधील अंतर ३०० ते ४०० मीटर इतके लांबचे देखील असू शकते आणि एवढया अंतराला हा उजेड पुरेसा नसतो. असा अपु-या उजेडात ऊसाच्या सडाने

जखमा, सर्पदंश, ऊस भरतात तेथे कोयत्याने जखमा होण्याचा खूप संभव असतो. अशा वेळी तातडीने इलाज होईलच असे सांगता येत नाही.

दिवसा हे लोक सतत ७ ते ८ तासापर्यंत फक्त ऊसतोडीचेच काम करताना आढळतात. मार्च एप्रिल महिन्यामध्ये तर अंगातून घामाच्या धारा वाहतात. पण त्यांचे काममात्र तशा उन्हातही चालताना दिसते.

शेतात जेवतानाही शिल्लक राहिलेल्या ऊसाच्या सावलीत बसूनच जेवण करताना ते आढळतात. ऊस तोडून त्याचे पाचट व वाढे कोयत्यानेच काढून टाकून ऊसाच्या मोळ्या बांधणे असे काम असते. काम करताना विशेषत: पुरुष ऊसतोडून त्याचे वाढे व पाचट बाजूला करतो आणि मागे टाकलेल्या ऊसाची मोळी बांधण्याचे काम स्त्रिया करतात. ऊसापासून अलग केलेल्या वाढयापैकी निम्मे वाढे ऊस शेतक-याच्या मालकीचे असते. ऊसतोडणी कामगार आतामात्र सर्वच वाढे आपल्या मालकीचे म्हणून घेतात. आता सगळीकडे जवळ जवळ हीच पध्दती प्रचलीत झाली आहे. ऊसतोडणी कामगार कधी-कधी सर्वच वाढे त्या शेतक-यालाच विकत असतो. जर त्या शेतक-याला गरज नसेल तर त्याला ते वाढे आसपासच्या गावा-मध्ये डोक्यावरुन वाहून नेऊन विकावे लागते. या कामी त्याची मुले मदत करताना आढळतात. एक प्रकारचे " श्रमविभाजन " येथे आढळून येते.

## १.६ ऊसतोडणी कामगारांचे प्रकार :

सर्वसाधारणत: ऊसतोडणी कामगारांच्या मध्ये दोन प्रकारचे कामगार आढळून येतात. त्यामध्ये अ) बैलगाडी घेऊन येणारे, ब) बैलगाडी नसणारे. या दोन्ही प्रकारच्या कामगारांची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे :-

अ) <u>बैलगाडी घेऊन येणारे</u> :


या प्रकारच्या कामगारांच्याजवळ स्वत:च्या बैलगाड्या असतात, किंवा ते कारखान्याच्या टायरच्या बैलगाड्यांचा वापर करतात. त्यांचे स्वत:चे बैल असतात. बड्या शेतकऱ्यांनी आणि कंत्राटदारांनी बैलगाड्यांचा ताफा तोडणी कामगारांना भाड्याने देणे चालू केले आहे. त्यामुळे शेतमजुराच्या रोजकमाईतून घट होते. टायर बैलगाडी ऊसतोडणी कामगारांना उपलब्ध होईलच असे सांगता येत नाही.

* <u>गाडीवानाच्या कामाचा मोबदला</u> :


एक साधी बैलगाडी जास्तीत जास्त ५ ते ६ मैलाची चाल करुन १ टन ऊसाची वाहतूक २४ तासात पुरी करते. तोडणी, भरणीसाठी ८तास, वाटचाल ३ तास, कारखान्याजवळ थांबण्यासाठी ६ तास, परतीची वाटचाल ३ तास करु शकते. बैलगाडीबरोबर गाडीवान, त्याची बायको व एखादा नातेवाईक धरुन तीन माणसांचे संबंध कुटुंब तोडणी, शीरवाहतूक (डोक्यावरुन वाहतूक) व ऊस वाहतूकीचे काम करीत असते. एका टोळीतील तीन माणसांना रोज मजूरी रु.२५.५० मिळते. म्हणजे प्रत्येक व्यक्तिला रोजंदारी म्हणून ८.५० रु पडते. बैलगाडीच्या कोयत्यांना मोफत वाढे देण्याची पध्दती असल्यामुळे त्यातून थोडीफार हातकमाई होते. म्हणून बैलांच्या खाण्याचा खर्च फारसा विचारात घेण्यासारखा नाही.

वरील स्थिती प्रतापराव शिंदे यांनी १९८४ ला " गोडवा " या मासिकाच्या मे,८४ च्या अंकात मांडली होती.[१३] आज ऊसतोडणी कामगारांना टनाला २१.०५ रु. मजूरी मिळते आणि वाहतुकीचा बैलगाडीला दिला जाणारा दर रु.९.०५ पहिल्या कि.मी.ला व नंतरच्या प्रत्येक

* आधी बैलगाडी *



* टायर बैलगाडी *



कि·मी·ला २·१० रु· दिला जातो· त्यामुळे वरील परिस्थितीत थोडीशी सुधारणा झालेली आढळते· परंतु १९८४ नंतर महागाईमध्ये झालेली वाढ लक्षात घेता फारशी सुधारणा झाली असे म्हणता येत नाही·

* टायर बैलगाडीपासून मिळणारे उत्पन्न [१४] :

टायर बैलगाडी - सोयीचे व परवडणारे असे वाहन आहे· सध्या बैलगाडीपेक्षा टायर बैलगाडीने एका फेरीतील वाहतुक उत्पन्न दुप्पट मिळते हे पुढील तक्त्यातून आढळते·

| वाहन प्रकार | हिशेबासाठी अंतर | वाहतूक आकार दर टनी | मालभरणी टन | एका फेरीतील वाहतूक उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| साधी बैलगाडी | १० मैल | १७·७० | १ | १७·७० रु· |
| टायर बैलगाडी | १० मैल | १७·७० | २ | ३५·४० रु· |

* गाडीवान कामगार - वास्तव स्थिती :

बैलगाड्यांनी उसाची वाहतूक करणा-या उसतोडणी कामगारांना फक्त उसतोडणी करणा-या कामगारापेक्षा जास्त पैसे मिळत असल्यासारखे वाटते· तरी देखील त्यांच्या एकूण आर्थिक परिस्थितीमध्ये जास्त सुधारणा घडून येतातच असे नाही· उसतोडणी कामगार ब-याच प्रमाणात कंत्राटदारांच्या मालकीचीच गाडी वापरतात· कंत्राटदार म्हणेल त्याप्रमाणे त्यांना वागावे लागते· कंत्राटदार मन मानेल तसे त्यांच्याकडून काम करुन घेतात·[१५]

कंत्राटदार स्वत:च्या मालकीच्या बैलगाड्यांचा वापर करीत असल्यामुळे शेतमजूरामध्ये (ऊसतोडणी कामगारामध्ये) बांधीलकी निर्माण होते. त्यामुळे दोन लाख शेतमजूर वेठबिगारीखाली कष्टमय जीवन जगत असतात.

कंत्राटदार म्हणजेच मुकादम हा ऊसतोडणी कामगारांचे शोषण करणारा घटक असतो. ज्याप्रमाणे तो ऊसतोडणी कामगारांची फसवणूक करतो. त्याचप्रमाणे तो सहकारी साखर कारखान्यांची देखील तो फसवणूक करतो.

बैलगाड्यांचा ताफा बांधून घेण्यासाठी दर हंगामात कंत्राटदाराशी करार करावे लागतात. त्यासाठी आगाऊ रक्कमा देण्याची प्रथा आहे. स्पर्धेमुळे कंत्राटदार अनेक कारखान्याकडून आगाऊ उचली घेतात. परिणामी बुडीत रक्कमा वाढू लागतात.[१६]

* <u>साखर कारखानदारापुढील धोका</u> :

दरवर्षी हंगामात कारखान्यांना बैलगाड्यांची जोडणी करावी लागते. बीड, उस्मानाबाद जिल्हयातील कंत्राटदारांना बांधून घेण्यासाठी कारखानदार प्रचंड धावपळ करीत असतात. स्पर्धेमुळे कंत्राटदार अनेक ठिकाणी आगाऊ रक्कमा उचलतात सन १९८४ या वर्षापर्यंत ३ कोटी पर्यंतची रक्कम बुडीत गेली ब्आहे. ज्या जिल्हयातून बैलगाड्यांचे ताफे उपलब्ध होतात त्या ठिकाणी औद्योगिक विकासाची केंद्रे सरकारला केंव्हा ना केंव्हा तरी निर्माण करावी लागणार आहेत. त्यामुळे ज्या प्रमाणात तेथून बैलगाड्यांची उपलब्धता कमी होत जाणार हे लक्षात घेऊन कारखान्यांनी वेळीच सावध व्हावे. आपआपल्या कार्यक्षेत्रातील शेतमजूरांना बैलगाड्या उपलब्ध करुन देण्याचा कार्यक्रम हाती घेणे शहाणपणाचे ठरेल.

बैलगाडीने ऊसवाहतूक आणि ऊस तोडणीचे काम करणारे कामगार कारखान्यांच्या परिसरातच राहतात व तेथून ८ ते १० कि.मी. अंतरावरील ऊसतोडणी व वाहतुकीचे काम करीत असतात.

ब) बैलगाडी नसणारे :

या कामगारांच्याकडे बैलगाडी नसते. ते कोयत्यावर ( पती-पत्नी किंवा दोन सभासद ) येतात. या कामगारांच्या जवळ स्वत:चे बैल नसल्यामुळे त्यांना बैलगाडीचा वापर करता येणे शक्य नसते. त्यामुळे त्यांना सतत फिरत रहावे लागते. या कामगारांनी तोडलेला ऊस कारखान्यापर्यंत पोहोचवण्याचे काम ट्रकने पूर्ण केले जाते. ट्रकमध्ये ऊस भरण्याचे कामही तेच करतात. परंतु बैलगाडीने ऊसवाहतुक करणा-या तोडणी कामगाराप्रमाणे त्यांचा प्रवासामध्ये वेळ खर्च होत नाही. बैलगाडीने ऊस वाहतूक करणा-या तोडणी कामगारापेक्षा त्यांच्याकडून ऊसतोडणी जास्त होते.

१.७ ऊसतोडणी कामगारांचा राहण्याचा परिसर :

सहकारी साखर कारखाने सुरु झाले की या कामगारांचे कराड तालुक्यात हळूहळू आगमन होते. साखर कारखान्यांना त्यांच्या गाळपक्षमते-प्रमाणे तोडलेल्या ऊसाचा सातत्याने पुरवठा करावा लागतो. तो करण्या-साठी हजारोंच्या संख्येने ऊसतोडणी वाहतूक करणारे दुष्काळी भागातील मजूर कराड परिसरात दाखल झाले आहेत. कराडच्या आसमंतात अनेक गावाच्या बाहेर ते आपल्या खोपटया उभ्या करतात. एक गांव संपले की,

खोपटी विस्कटून दुसरे गांव तिथे पुन्हा खोपटी, अशा खोपटया ते उभ्या करतात.

उसतोडणीच्या हंगामाच्या काळात त्यांना सतत फिरावे लागते. हंगामाच्या काळात जवळ-जवळ २० ते २५ वेळा ते आपल्या खोपटया बदलतात. त्या अर्थाने पाहिले तर कराडच्या भोवती एक प्रकारचे "शहर" सततच फिरत असते असे वाटू लागते.

जे उसतोडणी कामगार बैलगाडींचा वापर करतात ते कामगार विशेषत: कारखान्याच्या बाहेरील किंवा जवळच असलेल्या मोकळ्या जागेमध्ये ते आपल्या खोपटया उभ्या करतात. येथे असणा-या खोपटया ब-याच मोठया क्षेत्रात उभारलेल्या असतात. या खोपटयांच्या मध्येच मुकादमांनी (कंत्राटदार) आपली कांही दुकाने उभारलेली आढळतात. दुकांनांच्यामध्ये धान्य, साखर, तेल इत्यादी वस्तू ठेवलेल्या आढळतात. तसेच अशा ठिकाणी या कामगारांच्या मूळ गावाकडीलच कांही लोकांनी येथे हॉटेल्स उभारलेली दिसतात. एक मोठे असे खेडेच वसल्या सारखे वाटते.

जे उसतोडणी कामगार बैलगाड्यांनी वाहतुक करत नाहीत ते कारखाना परिसरापासून ८ ते १० कि.मी.च्या परिसराबाहेर राहतात. हे बाहेर राहणारे उसतोडणी कामगार टोळीने अथवा गटाने राहताना आढळतात. ज्या परिसरात उसतोडणीचे काम चालू असते. त्या परिसरातच ते वास्तव्य करतात. पहिल्या ठिकाणच्या जवळील किंवा परिसरातील उसतोडणीचे काम झाल्यानंतर ते दुस-या ठिकाणी उसतोडणीसाठी म्हणून जातात व तेथेच वास्तव्य करतात. तेथे वास्तव्यके केल्यानंतर आपणास फक्त पिण्याच्या

पाण्याची सोयच तेवढी ते पाहतात व तेथे राहतात.

## १.८ मुकादम - एक शोषक घटक :

मुकादम हा ब-याच वेळा त्यांच्यापैकीच असून देखील ते या ऊसतोडणी कामगारांचे शोषण करताना दिसतात. मुकादमांच्या मध्येही लहान आणि मोठे असे प्रकार असतात. लहान मुकादम ब-याचदा प्रामाणिक असतो. ते फक्त कारखान्याकडून मिळणारे एकूण कामाच्या १०% रक्कमच घेतात. परंतु मोठे मुकादम ते की, ज्यांच्याकडे ८ ते १० टोळ्यापासून ३० ते ४० पर्यन्त टोळ्या असतात. अशा मुकादमांची स्वत:ची धान्य, तेल इ. आवश्यक वस्तू या ऊसतोडणी कामगारांना पुरविण्याची तयारी असते. आवश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याची मुकादम तयारी दर्शवितो. त्या पाठीमागे त्याचा खूप मोठा स्वार्थ लपलेला असतो. आगोदर ऊसतोडणी कामगारांना त्यांनी उचल दिलेली असते. कामाच्या ठिकाणी पुरविलेले अन्नधान्य, दवाखान्यासाठी अथवा इतर कांही किरकोळ खर्चासाठी त्याना कांही रक्कम अगदी नगण्य अशा स्वरुपात ते पुरवितात. सर्व हिशेब ते स्वत: मांडून ठेवत असतात. कामाचे झालेले जमा पैसे आणि एकूण खर्च या अशिक्षित कामगारांच्या कांहीही लक्षात येत नाही.

मुकादमाचे वर्गीकरण एका लेखामध्ये करताना श्री.बळवंत गोहाड व बाळकृष्ण हेलवाडे यांनी तीन गटात केले आहे.[१७]

### १) छोटे मुकादम :

हे मुकादम स्वत: देखील ऊसतोडणीचे काम करतात.

२) <u>मध्यम प्रकारचे मुकादम</u> :

मध्यम प्रकारच्या मुकादमाकडे मोटार सायकल असते. तो स्वत: काम करीत नाही.

३) <u>मोठे मुकादम</u> :

मोठे मुकादम मात्र जीप, मारुतीमोटार अशा गाडयातून फिरणारे असतात. वरील सर्वच मुकादमांना ऊसाच्या टनानुसार कारखाना कमिशन देतो. हे मुकादम चांगल्या घरात भाडयाने रहात असतात.

ऊसाबरोबर वाढे चुकून जरी राहिले तर वजन २० किलोनी कमी करुन चिठ्ठी दिली जाते. या चिठ्ठया मुकादमास द्याव्या लागतात. त्यानुसार ते प्रत्येकाच्या नांवे ज्या नोंदी करतात त्याच ख-या नोंदी समजावयाच्या असतात. कारण हिशेब कांहीच माहीत नसल्याने आणि लिहिता वाचता येत नसल्याने स्मरणात काय राहील तेवढेच १५ दिवसानंतर मजुरीचे हिशेब घेतात. त्यात वर नमूद केलेल्या सर्व कपाती उचल वजा करुन राहिलेचे तर मुकादम जे कांही देईल ते द्यावे लागते.

आश्चर्याची गोष्ट अशी आहे की, मुकादमाने त्यांची कितीही पिळवणूक केली तरी या लोकांचा मुकादमावर पूर्ण विश्वास असल्यासारखे वाटते. बरेचजण मुकादमाला परमेश्वर मानतात. ऊसतोडणी कामगारांना कांही माहिती विचारण्याचा प्रयत्न केला की ते बिथरतात आणि आमच्या मुकादमाला विचारा असे सांगतात. "मुकादम" याघटकाबद्दल आणि त्यांच्या शोषणाबद्दल इतर मुद्यांच्या विश्लेषणाच्या वेळेस विवेचन होईल.

## १.९ निवास व्यवस्था :

राहण्यासाठी ऊसतोडणी कामगार कधीही भाडयाने खोल्या घेऊन रहात नाहीत. बैलगाडीने ऊसवाहतूक करणारे ऊसतोडणी कामगार कारखान्यांच्या बाहेर मोकळ्या जागेत झोपडया (कोपी किंवा खोली) उभारून राहतात. कृष्णा सहकारी साखर कारखाने रेठरे बु. सहयाद्री सहकारी साखर कारखाना या दोन्हीमार्फत झोपडयासाठी तट्टे आणि बांबूच्या ३ ते ४ कांब्या दिल्या जातात. वर्षाअखेरीस त्यांना हे साहित्य जमा करावे लागते.

या झोपडीत आगदी प्राथमिक स्वरूपाची भांडी ( एक-दोन पातेली, ताटे, तांब्या ) ठेवतात. तसेच अंथरूण आत ठेवले जाते. ५"x५" आकाराच्या झोपडीमध्ये हे लोक राहताना आढळतात.

गुजराथ उच्च न्यायालयाने ऊसतोड कामगारांच्या राहण्याच्या तसेच कामगारांच्या कामाच्या स्थितीबाबत चौकशी करण्यासाठी एक चौकशी समिती नेमली होती. या चौकशी समितीला याबाबत असे आढळून आले की, "ऊसतोड कामगारांना झोपडीत जेवण तयार करण्यासाठी परवानगी दिली जात नाही. रात्रीच्यावेळेला सर्व कुटुंबीय झोपडीत जेवण तयार करण्यासाठी परवानगी दिली जात नाही. रात्रीच्या वेळेला सर्व कुटुंबिय झोपडीत झोपू शकत नाहीत. अगदीच लहान मुले झोपविली जातात. बाकीचे सदस्य झोपडीच्या बाहेरच झोपतात."[१८]

कधी-कधी अशाही कांही घटना घडतात की, ज्यामुळे या ऊसतोडणी कामगारांची फारच हानी होते. ज्यावेळेस हे लोक कामाला जातात त्यावेळेला झोपडयांच्या ठिकाणी एखाद्या माणसाला राखण करण्या-

* कामाच्या ठिकाणची निवास व्यवस्था *



* स्नानगृह - एक तडजोड *



साठी ठेवतात. ४ ते ५ वर्षाची लहान मुले तेथे ठेऊन हे लोक जर कामाला निघून गेले तर ही मुले राणख करणा-या माणसाच्या लक्षातही येऊ शकत नाहीत. अशी लहान मुले तेथे खेळत बसलेली असतात. खेळत असताना खेळण्यासाठी म्हणून ही मुले काढयाची पेटी घेतात. मुले लहानच असल्या-मुळे काडया पेटवितात. आगोदरच अगदी कडक उन असते. त्यामध्येच या लहान मुलांच्या हातून झोपडीला आग लागू शकते. सर्व झोपडया जवळ-जवळ असल्याने सर्वच झोपडया आगीच्या भक्षस्थानी पडतात. १९८७ च्या हंगामामध्ये कराड तालुक्यातील चचेगाव या ठिकाणी अशा प्रकारे लागलेल्या आगीमध्ये तेथे असणा-या सर्व झोपडया जळून खाक झाल्या होत्या. आणि तीन बालके आगीच्या भक्ष्यस्थानी पडली होती. अशा प्रकारच्या ऊसतोडणी कामगारांचे सर्वस्व नष्ट करणा-या अनेक घटना घडू शकतात. या झोपडयांचा जर आजच्या निवासव्यवस्थेच्या प्राथमिक स्वरूपाच्या दृष्टी-कोनातून विचार केला तर पुढील महत्वपूर्ण बाबी आढळतात.

(I) पुरुषांच्यासाठी नाही, निदान स्त्रियांच्यासाठी तरी स्नान करण्यासाठी लागणा-या आडोशाची देखील गरज पूर्ण केलेली नसते.

(II) अन्न शिजविण्याचे काम बाहेर उघडयावर चालू असल्याचे दिसते.

(III) झोपडयांचा वापर फक्त साहित्य ठेवण्यासाठी तसेच शिजवलेल्या वस्तू ठेवण्यासाठी किंवा लहानमुलांना झोपण्यासाठीच होवू शकतो. किंवा लहान मुलांना झोपण्यासाठीच होऊ शकतो.


(I ) हंगामाच्या काळात जर वळीव स्वरूपाचा पाऊस झाला तर अशा पावसात भिजत राहण्याशिवाय पर्यायच राहत नाही.

थोडक्यात, अगदी कमीतकमी गरजापूर्ण होतील अशा प्राथमिक

* झोपडी (आतील बाजू) *



* झोपडी (बाहेरील बाजू) *



स्वरुपाच्या निवास व्यवस्थेच्या अटी देखील ही झोपड्यांच्या स्वरुपाची निवास व्यवस्था पूर्ण करु शकत नाही. त्यामुळे या झोपड्यांच्या व्यवस्थेला निवास व्यवस्था पूर्ण करु शकत नाही. त्यामुळे या झोपड्यांच्या व्यवस्थेला निवास व्यवस्था अशी संज्ञा देणे कितपत योग्य ठरेल हा येथे महत्वाचा प्रश्न ठरतो. ऊस तोडणी कामगार दरवर्षी या भागात येत असतात. त्यामुळे त्यांच्या निवास-व्यवस्थेचा प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

## १.१० ऊसतोडणी कामगार व कामाच्या परिसरातील समाज - यांच्यातील संबंध :

ऊसतोडणी कामगार हे ब-याच प्रमाणामध्ये दुष्काळ ग्रस्त भागातील शेतकरी किंवा शेतमजूर असतात. कराड तालुक्यातील स्थानिक लोक मात्र या लोकांना एकदम परक्यासारखे वागवितात असे आढळते. ऊसतोडणी कामगारांना हे स्थानिक लोक एकदम कनिष्ठ मानतात. ऊसतोडणी कामगार देखील तेथील स्थानिक लोकांच्यापासून जास्ती जास्त दूर राहण्याचा प्रयत्न करतात. तेथे त्यांना येणारे अनूभव खूपच वाईट असतात. उदा. ऊसतोडणी कामगारांच्या मध्ये सर्वच लोक मागासवर्गीय असतात असे नसताना तेथील उच्चवर्गीय त्यांना सर्वांना सरसकट मागासवर्गीय समजून त्यांच्याशी वर्तन करतो. एखादे वेळेस त्या भागात चोरीसारखे कृत्य झाले तर विनाकारण त्याच लोकांच्यावर संशय घेतला जातो.

जातीव्यवस्थेमुळे ज्याप्रमाणे अस्पृश्य लोक गावकुसाबाहेरच राहिले. त्याप्रमाणे हे लोकदेखील ज्या परिसरात काम करतात तेथील एखाद्या गावा-मध्ये आत रहात नाहीत. ते गावाच्या बाहेरच मोकळ्या माळावर आपली वस्ती उभारतात. अस्पृश्य नसतानाही त्यांना अस्पृश्यासारखे जीवन जगावे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

लागते. या ऊसतोडणी कामगारांचे जीवन शासनाने मागासवर्गीय ठरविलेल्या भटक्या जमातींच्या सारखे असूनही त्यांना भटक्या जमाती सारख्या सवलती मिळू शकत नाहीत.[१९]

तेथील स्थानिक लोक ऊसतोड कामगारांना "नगरी" या सामान्य नावाने संबोधतात. ऊसतोड कामगार जरी जवळच्या भागातील असले तरी अहमदनगर बीड या जिल्हयातील ऊसतोडणी कामगारांचे प्रमाण जास्त असल्यामुळे सर्वांनाच तेथे तसे संबोधले जाते.

अहमदनगर, बीड येथील ऊसतोडणी कामगारांचे विशिष्ट हेलामध्ये असणारे बोलणे, एकदम बिचकून वागणे, अज्ञान इ. बाबीमुळे हे लोक येथील स्थानिक समाजापासून आपोआप अलिप्त होतात. स्थानिक ठिकाणी होणारे राजकीय मेळावे सार्वजनिक सभा यांच्याकडे हे लोक अजिबात फिरकत नाहीत. फक्त त्या परिसरात साज-या केल्या जाणा-या यात्रा, आठवडयाचा बाजार यांच्यामध्ये हे लोक सहभागी होतात. पण ते ही अगदी मर्यादित स्वरुपामध्ये स्थानिक यात्रामध्ये करमणुकीचे कार्यक्रम पाहण्यासाठी हे लोक आलेले दिसतात. परंतु स्थानिक लोकांच्याप्रमाणे त्यांना उत्साहाने सहभागी होता येत नाही. आठवडा बाजारात कांही आवश्यक प्राथमिक वस्तू घेण्यासाठी ते सामील होतात.

तेथील स्थानिक लोकांच्याकडून त्यांना अल्पशा चुकीमुळेदेखील मोठा त्रास दिला जातो. उदा. शेताकडेच्या कुंपणाच्या काठया जर त्यांनी जळणासाठी म्हणून वापरल्या तर तेथील स्थानिक लोक त्यांना मारहाण करण्यास मागेपुढे पाहात नाहीत. त्यामुळे ते तेथील स्थानिक लोकांच्यापासून जास्तीतजास्त दूर राहण्याचा प्रयत्न करतात. तेथील विवाहादी प्रसंगी हे लोक कधी-कधी लोकांनी न बोलावता देखील जर, जेवण्यासाठी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आले तर त्यांना पंगतीतून उठवून घालविण्याचे प्रकार घडतात. थोडक्यात, ... तेथील स्थानिक लोकांच्या समाजामध्ये त्यांना कोणत्याच प्रकारचे स्थान न दिले गेल्यामुळे ते सहभागी होऊ शकत नाहीत.

१.११ ऊसतोडणी कामगारांचे दैनंदिन जीवन :

त्यांचे द्व दैनंदिन जीवन ठराविक पध्दतीने आखून दिल्यासारखे वाटते. त्यात बदल दिसूनच येत नाही. दररोज उठल्याबरोबर पहाटेच हे लोक ऊसाच्या फडामध्ये दाखल होतात. सकाळी ७ ते ८ पर्यन्त त्यांनी दिवसातील एकूण ऊसाच्या निम्मा ऊस तोडून ठेवलेला असतो. ११ ते १२ वाजेपर्यंत ऊसतोडीचे काम चालूच असते. १२ वाजण्याच्या सुमारास शेती-साठी पाणीपुरवठा केला जाणाऱ्या ठिकाणी जर पाणी असेल तर हे लोक तेथे आंघोळ करतात. नसेल तर मात्र नदीत किंवा विहिरीत ते आंघोळ उरकून घेतात.

काम चालू असताना लहान मुले ऊसाच्या शेताजवळील मोकळ्या जागेत एखाद्या झाडाखाली बसविली जातात. १२ वाजेपर्यंत ऊसतोडणी काम-पूर्ण झाले तरीदेखील त्यांना तेथून पुढे तेथेच थांबावे लागते. कारण ऊसाचा ट्रक भरुन देण्याची जबाबदारी ही त्यांचीच असल्यामुळे त्यांना दिवसभर तेथेच अडकून बसावे लागते. जर ऊसतोडीस दुपारी ३ ते ४ नंतर सुरवात केली असेल तर रात्री जेंव्हा ट्रक येईल तेंव्हा तो भरुन देण्यासाठी जावे लागते.

त्यांच्या वरील दैनंदिन जीवनात कधीच बदल आढळत नाही. फक्त ज्या दिवशी कारखाना क्लीनींगसाठी बंद असतो. त्यादिवशी किंवा, कारखान्याला ज्यादिवशी सुट्टी असते त्या दिवशी या लोकांचे काम बंद

असते. तेवढाच एखादा दिवस त्यांना विश्रांतीसाठी मिळतो. तेच-तेच काम दैनंदिन जीवनामध्ये असणारा तोच तो रखाळपणा यामुळे त्यांचे जीवन अगदी नीरस बनून गेलेले असते. ही अवस्था असते. बैलगाडीने ऊस वाहतूक न करता फक्त ऊस तोडणी करुन तो ट्रक अथवा ट्रॅक्टरमध्ये भरुन देणा-या ऊसतोडणी कामगारांची.

बैलगाडीने ऊस वाहतूक करणारा ऊसतोडणी कामगार हा कारखान्याच्या बाहेरील आवारातच रहात असतो. पहाटेच तो मुकादमाने चिठ्ठी दिलेल्या शेतावर ऊसतोडणीसाठी आपली बैलगाडी घेऊन जातो. त्याच्याबरोबर टोळीतील इतरही गाडीवान असतात, गाडीतून तो, त्याची बायको व मुले मिळून उसाच्या शेतावर जातात. हे अंतर जास्तीत जास्त ८ ते ९ कि.मी.असते. तेथे ऊसतोडणी करुन गाडी भरुन तो कारखान्याकडे १२ ते १ च्या दरम्यान परतण्यास सुरुवात करतो. दुपारी २ च्या पुढे देखील कांहीजण आपली बैलगाडी घेऊन कामासाठी बाहेर पडतात. ते ७ ते ८ पर्यंत परतू लागतात. परतताना उसाची भरलेली गाडी तीमध्येच त्यांची पत्नी,अगदी लहान मुले हे बसून परतत असतात. गाडीतच बसून जेवण खाण्याचे काम चालू असल्याचे बरेचदा आढळते. कारखान्यावर परतल्यानंतर नंतरचा स्वयंपाक करण्यासाठी त्यांची बायको लहान मुलांना घेऊन खोलीकडे परत जाते. ऊसतोडणी गाडीवान आपली गाडी खाली करण्यासाठी रांगेला आपली गाडी लावून तेथेच थांबतो. जेंव्हा गाडी खाली होईल तेंव्हा तो खोपीकडे परततो जर पहिल्या ठिकाणचा ऊस संपला असेल तर मुकादमाकडून दुस-या ठिकाणच्या उसाच्या शेताची तो पावती घेतो. दुस-या दिवशी आहे तसाच त्याचा दिनक्रम पुढे चालूच राहतो.

जे ऊसतोडणी कामगार (बैलगाडीवाले) कारखान्याच्या बाहेरच्या आवारातच रहात असतात. ती बाहेरील जागा कारखान्याच्या मालकीची

असतेच असे नाही. ती जागा जेंव्हा खाजगी मालकीची असते तेंव्हा त्या खोपीच्या ५"x५" एवढया जागेचे देखील त्यांना भाडे द्यावे लागते. तो जेंव्हा भाडे देउ शकत नाही तेंव्हा कांही वाढयाच्या पेंढया त्याला त्या मोकळया जागेच्या मालकाला द्याव्या लागतात.

थोडक्यात त्यांच्या दैनंदिन जीवनामध्ये कसल्याही प्रकारचा बदल आपणास आढळून येत नाही. एखाद्या यंत्राप्रमाणे त्यांचे जीवन कंटाळवाण्या पध्दतीने चालू असते.

१.१२ <u>उसतोडणी कामगार व त्यांचे जीवन</u> :

उसतोडणी कामगारांच्या शिवाय सहकारी अथवा खाजगी क्षेत्रामधील साखर कारखाने आणि स्थानिक गु-हाळघरे चालणेच अशक्य आहे. कारखाने साखर निर्मिती करतात. त्यावरील कररुपाने उपलब्ध होणारी रक्कम सरकारच्या तिजोरीत पडून सरकारी तिजोरीत भर पडते. उस पिकविणारे शेतकरी आपला स्वत:चा हिस्सा उचलतात. कारखान्याला उत्पन्नाचा कांही भाग मिळतो. कारखान्याच्या आतील कामगार आपला हिस्सा घेतात आणि शेवटी क्रम लागतो तो उसतोडणी करणा-या कामगारांचा.

साखर कारखानदार आणि उस उत्पादक यांना जरी जास्त हिस्सा उपलब्ध होत असला तरी त्यांचे कष्ट नाकारता येणार नाहीत. पण त्यांच्या पाठोपाठ मोठा हिस्सा उचलणारे ऐतखाउ मुकादम अथवा कॉन्ट्रॅक्टर ठरतात हे दुर्दैव आहे.

याचाच अर्थ कष्ट न करणा-या मुकादम,कॉन्ट्रॅक्टर यांना मोठया प्रमाणामध्ये मलई मिळते.[२०] कारखान्यातील अन्य कामगारांचे वेतनही इतर

धंद्यातील कामगारापेक्षा कमी आहे. तोडणी-वाहतूक कामगार, ट्रॅक्टर, ड्रायव्हर, ट्रक ड्रायव्हर, क्लीनर, बैलगाडीवान, ऊसतोडणी कामगार यांना मिळणारा वाटा अत्यल्प आहे. त्यांना मिळणारे वेतन पुढीलप्रमाणे:

तोडणी वाहतूक गाडीवानांचे १९८५-८६ पर्यंतचे प्रचित दर खालील प्रमाणे असून सुधारीत दर म्हणजे १९८६-८७, ८७-८८, ८८-८९ या हंगामाकरीता आहेत. हे दर जर पदरात पाडून घ्यावयाचे असतील तर दोन कामगार, दोन बैल व गाडी यासह राबावे लागते.[२१]

| कामाचा प्रकार | प्रचलित दर प्रती टन | सुधारित दर प्रतीटन |
|---|---|---|
| बैलगाडी - ऊसतोडणी | ११·०० | २१·०५ |
| बैलगाडी - वाहतूक पहिला मैल | ६·०० | ९·७० |
| बैलगाडी वाहतूक पुढील प्रत्येक मैलास | १·३० | २·१० |
| ट्रक, ट्रॉलीतून ऊसतोडणी करुन डोक्यावरुन वाहतूक करुन ट्रक ट्रेलर मध्ये भरुन देणे व १०० मीटरपर्यंत वाहून नेणे. | १४·२५ | २३·१० |
| उसाची तोडणी व बैलगाडीने वाहतूक करुन तो ट्रक अगर ट्रॅक्टर मध्ये भरुन देणे | १६·५० | २६·७५ |

वरील दर कारखान्यांनी मुकादम व कंत्राटदारांना द्यावयाच्या कमिशन व्यतिरिक्त आहेत. मुकादम व कंत्राटदार यांना ११% कमिशन दिले जाते.

वरील प्रमाणे वाढीव वेतन जाहीर झाले तरी ते ऊसतोडणी कामगारांना लवकरच प्राप्त होईल असे म्हणता येत नाही. मुकादम फरकाच्या रक्कमेचा किती भ्रष्टाचार करतील हे देखील सांगता येणार नाही.

वाढीव दर लक्षात घेता ऊसतोडणी करणा-या कोयत्याला (जोडीला) एकूण ३० ते ३२ रु. पर्यंत हजेरी मिळेल. म्हणजे एका व्यक्तिला दिवसाकाठी १५ ते १६ रु. रोजगार उपलब्ध होईल. तर बैलगाडीवान कोयत्याला (जोडीला) ४२ ते ४३ रुपये मजूरी मिळेल. त्यांच्या कष्टाच्या-मानाने त्यांना मिळणारे हे वेतन अत्यल्प वाटते.

## १.१३ ऊसतोडणी कामगारांचे कामाच्या ठिकाणचे कौटुंबिक जीवन :

ऊसतोडणी कामगारांच्या मध्ये बरीचशी विवाहीत जोडपी आढळून येतात. ते पती-पत्नी आणि त्यांची लाहान मुले असे स्वरुप आढळते. एक प्रकारचे केंद्रित स्वरुपाचे कुटुंब आपणाला येथे आढळते. मूळ गावाकडे या कामगारांच्या कस्टावर अवलंबून असणारे इतर घटक असण्याची शक्यता असते. एका खोपीमध्ये हे कौटुंबिक जीवन बद्द झाल्यासारखे वाटते. पती आणि पत्नी हे दोनच घटक प्रामुख्याने ऊसतोडणी कामगाराच्या कुटुंबात आढळतात. त्यांना त्यांचे वैवाहिक जीवन अगदी सामान्य पद्दतीने देखील जगता येणे अशक्य आहे. त्यांच्या छोटयाशा झोपडीत फक्त

लहान मुलेच झोपू शकतील एवढी अल्प जागा असते. इतरांना झोपडीच्या बाहेरच झोपावे लागते. त्यामुळे कौटुंबिक दृष्टीकोनातून पती पत्नींच्या लैंगिक संबंधाच्या बाबतीत एकांत मिळणे अशक्य असते. ब-याच वेळा लैंगिक संबंध रात्री झोपीच्या बाहेरच पूर्ण होतात.

ऊसतोडणी कामगारांमध्ये कुटुंबाचे प्राथमिक स्वरूप ( पती-पत्नी, मुले) असे आढळते. हे कुटुंब नवराबायकोमधील प्रेमभावनेवरच आधारित असल्या सारखे वाटते. ऊसतोडणी कामगार हा पत्नी आणि मुले या मर्यादित विश्वात गुरफटलेला आढळतो. त्याची टोळी हा त्याचा समाज म्हणावयास हरकत नाही. कामाच्या ठिकाणी ऊसतोडणी कामगार येथील स्थानिक समाजाच्या रीतिरिवाजाप्रमाणे न वागता ते ज्या भागातून येथे आले तेथील सर्व रितीरिवाज आपल्या कुटुंबामध्ये पाळतो.

बरेचसे ऊसतोडणी कामगार नुकतेच विवाहित झालेले असे आढळतात. त्यामुळे त्यांचे कुटुंब केंद्रकुटुंब किंवा विभक्त कुटुंब असल्यासारखे वाटते. पण तरीही मूळ गावीदेखील त्यांच्या एकत्र कुटुंबाचे इतर सदस्य असू शकतात आणि त्यांच्या निर्वाहाची जबाबदारी ऊसतोडणी कामगारावर असते. त्यामुळे एकत्र कुटुंब पध्दती असूनही तो विभक्त कुटुंबपध्दतीतच जगत असतो. असे वाटते. कांही शेतकरी कुटुंबामधील एखादी तरी व्यक्ती ज्याप्रमाणे सरकारी नोकरीत अथवा एखाद्या चांगल्या ठिकाणी नोकरीसाठी शहरात किंवा इतर ठिकाणी रहात असते व आपल्या उदरनिर्वाहासाठी लागणारी रक्कम खर्च करुन राहिलेली रक्कम आपल्या गावाकडे पाठविते. त्याप्रमाणेच ही स्थिती वाटत असली तरी तेथे फरक एवढाच आहे की, ऊसतोडणी कामगार आपली रक्कम मुळ गावाकडे जुन्या कर्जफेडीसाठी आणि उदरनिर्वाहासाठी (फक्त अत्यल्प) पाठवीत असतो. इतर नोकरांची मूळ गावाकडे

पाठविलेली रक्कम ही ब-याच वेळा त्यांच्या कुटुंबाच्या स्थितीत सुधारणेसाठी वापरली जाते· इतर सुस्थितीतील नोकरांच्या कुटुंबाशी ऊसतोडणी कामगाराच्या कुटुंबाची तुलना होउ शकत नाही· त्यांचे कुटुंब कामाच्या ठिकाणी घराचा पत्ता नसलेले, कसलीही सुरक्षितता नसलेले कसल्याही प्रकारच्या सार्वजनिक सुविधा नसलेले असे आढळते·

## १·१४ ऊसतोडणी कामगाराचे सामाजिक जीवन :

पुर्वी उल्लेख केल्याप्रमाणे ऊसतोडणी कामगार कामाच्या ठिकाणच्या स्थानिक समाजापासून अलग रहातो, त्याची टोळी हाच त्याचा समाज असतो· आपल्या टोळीमध्ये असणा-या वयस्कर लोकांच्याविषयी तो आदर बाळगतो· आपल्या टोळीतील सदस्यांच्या सुखदु:खामध्ये तो सहभागी होतो· स येथील स्थानिक समाजात अथवा त्यांच्यामुळे गावाकडे असणा-या स्थानिक समाजात असणारे रीतीरिवाज सामाजिक दर्जाविषयी कल्पना ऊसतोडणी कामगार येथे देखील पाळताना आढळतात· ऊसतोडणी कामगार ज्या टोळीच्या स्वरुपात रहातात त्याला त्यांचा समाज म्हणावयास हरकत नाही· कारण समाज स्वरुपाची जी लक्षणे आहेत· त्यातील सर्वच बाबी ऊसतोडणी कामगाराच्या टोळीस्वरुपी समाजाला लागू होतात· समाजाच्या स्वरुपासंबंधीची लक्षणे पुढील प्रमाणे :[२३]

( I ) भौगोलिक प्रदेश हे समाजाचे व्यवच्छेदक लक्षण असावे· तरी ते अनिवार्य स्वरुपाचे लक्षण नाही·

( II ) लोकसंख्या व तिचे सातत्याने होणारे नूतनीकरण यांचा एक समाजलक्षण म्हणून विचार करता येईल·

( III ) लोस समुदायाची वैशिष्टयपूर्ण जीवनपध्दती·

( I ) श्रमवाटणी किंवा विभागणी·

वरील सर्व लक्षणे लक्षात घेता ही सर्व लक्षणे ऊसतोडणी कामगारांच्या टोळीमध्ये आढळतात· म्हणून कामाच्या ठिकाणी त्यांची समाजव्यवस्था आपोआप निर्माण झालेली असते·असे म्हणावयास हरकत नाही· ते विशिष्ट भौगोलिक परिस्थितीत रहात नसले तरी देखील लकसंख्येचे नूतनीकरण वैशिष्ट्यपूर्ण जीवनपध्दती श्रमविभागणी त्यांच्यात आढळते·

येथे एवढेच म्हणता येईल की, ऊसतोडणी कामगारांचा समूह हा त्यांचा समाज असतो· त्यांचे रीतीरिवाज ते पाळत असतात· फक्त त्यांचा अशा स्वरुपाचा हा समाज मर्यादित स्वरुपाचा असतो आणि तो आपल्या समाजाला योग्य वाटेल असे वर्तन ठेवण्याचा प्रयत्न करतो·

१·१५ ऊसतोडणी कामगार व राजकीय स्थिती :

ऊसतोडणी कामगार हा राजकीय परिस्थिती बाबत बराचसा अनभिज्ञ वाटतो· स्वत:च्या हक्काची देखील जाणीव या कामगारांच्यामध्ये अजून निर्माण होऊ शकली नाही· त्यांच्यामध्ये आपली पिळवणूक होत आहे· आपले राहणीमान निकृष्ट आहे· आपले न्याय्य हक्क आपण मागीतले पाहिजेत या विचारांची जाणीव निर्माण करण्याचे प्रयत्न संतराम पाटील यांसारख्या नेत्याकडून होत आहेत· अजूनही ऊसतोडणी कामगारांच्यामध्ये राजकीय जागृती पुर्णपणे आली आहे असे वाटत नाही· साखर कारखाना महासंघाने व इंटकने ऊसतोडणी कामगारांच्या उत्कर्षासाठी खूप मोठा लढा उभारला आहे· [२३]

ऊसतोडणी गाडीवान कामगारांनी १९८६ च्या आक्टोंबर-नोव्हेंबर

8745
A

मध्ये दरवाढ मिळाल्याशिवाय गावे सोडायची नाहीत. गावात राहून संप करायचा असा निर्णय महासंघाच्या नेतृत्वाखाली केला. हा लढा कामगारांनी यशस्वी केला.

१.१६ गळीत हंगामानंतरची स्थिती :

गळीत हंगाम ही ऊसतोडणी कामगारांची सुगीच असते. एकदा हंगाम संपला की पुन्हा त्यांना अन्नान करण्याची पाळी येते. मग हे कामगार आपल्या भागाकडे रोजगारहमीच्या कामासाठी टोळ्याटोळ्यांनी परतताना दिसतात. साखर कारखान्याचे गळीत हंगाम संपले की बडा पाहुणा किंवा मंत्रीमहोदयांना बोलावून मोठा आनंदोत्सव साजरा करतात. सत्यनारायण पूजाही घालतात. पण आता आपल्याला पोटाची खळगी भरण्यासाठी कोठे काम मिळणार या विवंचनेने या दरिद्रीनारायणांच्या पोटात भीतीचा खड्डा पडलेला असतो.आणि त्यांचे डोळे अश्रूंनी भरलेले असतात.[२४] ऊसतोडणी कामगार हंगाम संपताच आपल्या मूळ गावाकडे वळतो. हंगामानंतर रोजगार कुठे उपलब्ध होईल की नाही याची त्याला काळजी असते. वि.म.दांडेकर आणि रथ यांनी अनिर्वाहक्षम शेतकरी, भूमिहीन शेतमजूर स्वत:च्या गावालाच चिकटून का रहातात याचे विश्लेषण करताना असे म्हटले आहे की, " शेतीचे उत्पन्न व निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असले तरी जे कांही असेल ते सुरक्षित व भरवशाचे असते. त्यामुळे प्रत्येकजण जी कांही थोडीशी जमीन असेल अ तिला चिकटून असतो."[२५] तसेच गावा-कडील शेतमजूरी परिचयाची असते आणि घराजवळ व गावाजवळ असते. म्हणून शेतमजूरीच्या आशेने ही माणसे गावास चिकटून राहून असेल नसेल ते काम मिळविण्याकरिता धडपडतात.

ऊसतोडणी कामगारांची स्थितीदेखील ब-याच अंशी अशीच असते. अगदी कोठेच काम उपलब्ध झाले नाही तरी मूळ गावाकडे रोजगार हमी योजनेच्या कामावर तरी जागा मिळण्याची शक्यता त्यांना वाटते.

-x-x-x-x-x-

संदर्भ :


१. वसंत तुळपुळे - १९७०, भांडवल खंड १ - कार्ल मार्क्स (अनुवादीत) पुणे प्रागतीक पुस्तक प्रकाशन, पृष्ठ ५७०.

२. मोहन तावडे १९७६, महाराष्ट्राचा भूगोल - सी.डी.देशपांडे(अनुवादीत) नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया पृष्ठ ३४

३. डॉ.सुलभा ब्रम्हे, १९८७, दुष्काळ लोकवैज्ञानिक नियोजनाचा, पुणे लोकविज्ञान प्रकाशन. पृष्ठ ३६.

४. बी.एस.मिन्हास १९७१ " रुरल पॉव्हर्टी - नंबर्स गेम्स अॅन्ड प्रॉब्लेम्स " इंडियन इकॉनॉमिक रिव्हीन्यूव, न्यू सेरिज पृष्ठ १०२

५. डॉ.सुलभा ब्रम्हे - उपरोक्त, पृष्ठ ३६

६. वि.म.दांडेकर/म.भा.जगताप -१९५७, महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना पुणे, गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्था, पृष्ठ ७३.

७. व्ही.एम्.दांडेकर/निलकंठ रथ,१९७१, पॉव्हर्टी इन इंडीया, पुणे गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलीटिक्स अॅन्ड इकॉनॉमिक्स, पृष्ठ १४२.

८· शरद पवार, १९८८ " फॉर फार्मर्स अँड द लँडलेस टू लिव्ह इन डिग्नेटी " मुंबई, डायरेक्टोरेट जनरल ऑफ इन्फरमेशन अँड पब्लीक रिलेशन, गव्ह·ऑफ महाराष्ट्र· पृष्ठ १

९· ए·आर·देसाई १९८४, सरल सोशॉलॉजी इन इंडीया (चौथी आवृत्ती) मुंबई पॉप्युलर प्रकाशन प्रायव्हेट लि·,पृष्ठ क्र·१७·

१०· डॉ·सुलभा ब्रम्हे – उपरोक्त पृष्ठ ३६·

११· " मायग्रंट वर्कर्स – सुपर एक्सप्लॉयटेशन अँड आयडेंटीटी केस ऑफ शुगर केन कटर्स इन गुजराथ " ४ जून,१९८८ डी·एन·इकॉनॉमिक अॅन्ड पॉलीटीकल विकली – ए·समिक्षा ट्रस्ट पब्लीकेशन व्हॅल्यूम III नं·२३

१२· दै·पुढारी वर्तमानपत्र दि·६ नोव्हेंबर,१९८८ (पुढारी,कोल्हापूर)पृ·१

१३· प्रतापराव शिंदे मे,१९८४ "टायर बैलगाडी" गोडवा, मुंबई, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ पृ·२८·

१४· तत्रैव पृष्ठ ३२

१५· तत्रैव पृष्ठ ३१·

१६· तत्रैव पृ·३२

१७· बळवंत गोहाड/ बाळकृष्ण हेलवाडे· १८ मे,१९८८ "ऊसतोडणी व वाहतूक कामगारांची वेठबिगारीतून मुक्तता होणे जरुर " सातारा दै· ऐक्य, संपादक दै·ऐक्य, पृ·३·

१८· उपरोक्त - इकॉनॉमीक अॅन्ड पॉलीटिकल विकली, व्हॅल्यूम xxIII नं·२३

१९· दिनकर पाटील, २८ मे,१९८८ " गळीत हंगाम संपला आता उसतोडणी-च्या टोळ्या रोजगार हमी योजनेकडे " - कोल्हापूर दै·सत्यवादी· संपादक - दै·सत्यवादी पृ·१·

२०· उपरोक्त - दै·ऐक्य ( सातारा ) पृष्ठ ३·

२१· तत्रैव - पृष्ठ ३

२२· डॉ·पु·ल·भांडारकर /प्रा·नि·स·वैद्य, १९७९ समाजशास्त्रीय सिध्दांत नागपूर महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, पृष्ठ २७ व २८·

२३· संतराम पाटील, २ जानेवारी,१९८९ "साखर कामगारांचा न्याय मागण्यासाठी लढा " पुणे· दै·केसरी, संपादक दै·केसरी·

२४· उपरोक्त - दै·सत्यवादी - पृष्ठ १·

२५· उपरोक्त - पॉव्हर्टी इन इंडीया पृष्ठ १४२-४३·

=0=0=0=0=0=